# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 52/2022 दिनांक : 06.02.2022**

# 1)घरफोडी :-

**नांदेड ग्रामीण** :-दिनांक 03.02.2022 रोजी चे 08.30 वा. ते दि. 04.02.2022 चे 22.30 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे राहाते घरी तिरुपती सोसायटी धनेगाव ता. जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हे आपले राहाते घर कडी कोंडा लावून त्यांचे मुलाचे कुलदैवत सेलु येथे गेले असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादीचे घराचे कडी कोंडा तोडुन घरात प्रवेश करुन सॅम्पलच्या चांदीच्या अंगठया कि.अं. 20,000/-रुपयाचा माल चोरुन नेला आहे. वगैरे **फिर्यादी अनिल लक्ष्मणराव शहाणे, वय 37 वर्षे, व्यवसाय चांदी कारागीरी रा. तिरुपती सोसायटी धनेगाव, ता.जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्याद वरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 66/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2121 पांचाळ, मो.क्र. 9011079556** हे करीत आहेत.

# 2)मोबाईल चोरी :-

**शिवाजीनगर** :-दिनांक 26.12.2021 रोजी चे 16.00 वा. चे सुमारास, **एम.एफ. होंडा सैलानी हॉटेल जवळ,नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा ॲटोने प्रवास करीत असताना शर्टचे वरचे खिशात ठेवलेले सॅमसंग व रेडमी कंपनीचे दोन मोबाईल किंमती 25,000/- रुपयाचे कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी माधव शंकर पापुलवार, वय 42 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. बाचोटी ता. कंधार जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 42/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/2547 वाघमारे**, **मो.क्र. 8669005593** हे करीत आहेत.

# 3)मो. सा. चोरी :-

**1)देगलूर** :-दिनांक 30.01.2022 रोजी चे 21.30 वा. ते दिनांक 31.01.2022 चे सकाळी 05.00 वा. दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोरुन गांधीनगर,देगलूर ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची बजाज डिस्कव्हर कंपनीची काळया रंगाची मो.सा. क्र. एमएच-26/ए.बी.-0560 किंमती 15,000/-रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी दत्तात्रय नरसिंगराव पांचाळ, वय 42 वर्षे, व्यवसाय श्रध्दा ग्लासवर्क रा. गांधीनगर,देगलूर ता. देगलूर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरनं 60/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री कांबळे, मो.क्र. 9821159844** हे करीत आहेत.

# 4)गंभीर दुखापत :-

**1)वजिराबाद** :-दिनांक 03.02.2022 रोजी चे 20.45 वा. चे सुमारास, **डॉ. कोटलवार यांचे घरासमोर सोमेश कॉलनी, नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीहा फिर्यादीचे घरा समोर सिगारेट ओढत उभा टाकला असता फिर्यादीने माझ्या घरासमोर सिगारेट ओढु नकोस तु येथुन निघुन जा असे म्हणुन समजावुन सांगत असताना आरोपीने त्याच्या जवळील खंजर काढुन फिर्यादीच्या पोटाच्या उजवे बाजुस, उजव्या हाताचे बगलेजवळ तसेच उजव्या दंडावर जिवे मारण्याच्या हेतुने वार करुन फिर्यादीस गंभीर जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी सुनिलसिंग बजरंगसिंग परदेशी, वय 46 वर्षे, व्यवसाय नौकरी मर्चन्ट बॅक शिपाई रा. सोमेश कॉलनी, नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरन 28/2022 कलम 307,506 भादवि सह कलम 4/25 भाहका प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **पोउपनि/श्री जाधव, मो. नं. 9823352701** हे करीत आहेत.

**2)देगलूर** :-दिनांक 01.02.2022 रोजी चे 17.30 वा. ते 18.00 वा. दरम्यान, **मौजे तुपशेळगाव येथील फिर्यादीचे घरासमोर, ता. देगलूर जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी गैरकायदयाची मंडळी जमवून, मा. जिल्हाधिकारी साहेब, नांदेड यांचे जमाव बंदी आदेशाचे उल्लंघन करुन, आरोपीस जनावरे बांधू नका म्हणाल्याने फिर्यादीस जिवे मारण्याच्या उद्देशाने लोखंडी टॉमीने डोक्यात मारले, फिर्यादीचा भाऊ सोडविण्यास आला असता त्याचे डाक्यात लोखंडी रॉडने मारुन डोके फोडले व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी जयदिप नरसिंग जाधव, वय 22 वर्षे, व्यवसाय शेती रा. तुपशेळगाव ता. देगलूर जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे देगलूर** गुरन 58/2022 कलम 307,324,143,144,147,148,149,504,506 भादवि सह कलम 135 म. पो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोनि/श्री परगेवार, मो. नं. 9028846691** हे करीत आहेत.

**3)नायगाव :—**दिनांक 04.02.2022 रोजी चे 20.00 वा. ते 20.30 वा. दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी मौजे कोलंबी ता. नायगाव जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व आरोपी हे शेकोटी करुन शेकत व बोलत बसले असता आरोपीने फिर्यादीस तु माझे लग्न का लावून देत नाहीस म्हणुन लाकडाने फिर्यादीचे डोक्यात,हाताला,पाठीत,पायावर जबर मारहाण करुन गंभीर जखमी केले व शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. मारहाणीत फिर्यादीचा तोल जावून शेकोटीच्या जाळावर पडल्याने शरीर भाजले. वगैरे **फिर्यादी बालाजी राघोबा डिकळे, वय 45 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. कोलंबी ता. नायगाव जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे नायगाव** गुरन 21/2022 कलम 326,323,504,506 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **सपोउपनि/श्री वाघमारे, मो. नं. 9096618241** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :—

**मनाठा :—** दिनांक 25.02.2020 पासुन मागील सहा महिन्या पर्यंत, **फिर्यादीचे राहते घर वैदु नगर अर्धापुर व बरडशेवाळा ता. हदगाव जि.नांदेड येथे,** यातील फिर्यादी बाईस यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करुन माहेरहुन पैसे घेवून म्हणुन चारित्र्यावर संशय घेवून तीचा शारिरीक व मानसीक छळ करुन मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 20 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे मनाठा** गुरनं 19/2022 कलम 498(अ), 323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास मपोना/12 पवार**, **मो.क्र. 9552586212** हे करीत आहेत.

## 6)विषारी औषध पिल्याने मृत्यु :—

**नायगाव** :—दिनांक 29.01.2022 रोजी चे 08.00 वा.सुमारास, **सरकारी दवाखाना,नांदेड येथे,** यातील **मयत नामे परसराम नागोबा वडजे, वय 60 वर्षे, रा. टेंभुर्णी ता. नायगाव जि. नांदेड**, हा शेतीचे कर्जास कंटाळुन कोणतेतरी विषारी औषध पिवून आत्महत्या केली. वगैरे **खबर देणार कैलास परसराम वडजे वय 33 वर्षे व्यवसाय शेती रा. टेंभुर्णी ता. नायगाव जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे नायगाव** आ. मृ. **04**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री वाघमारे, मो.नं. 9096618241** हे करीत आहेत.

## 7)गळफास घेवुन मृत्यु :—

**शिवाजीनगर :—**दिनांक 04.02.2022 रोजी चे 16.30 वा. चे सुमारास, **वाडीया फ्रॅक्टरी एरिया गार्गी हॉस्पीटल चे बाजुस,शिवाजीनगर, नांदेड येथे,** यातील **मयत नामे सौ. अनुजा सागर मापारे वय 40 वर्षे, रा. वाडीया फ्रॅक्टरी एरिया गार्गी हॉस्पीटल चे बाजुस,शिवाजीनगर, नांदेड** यांची मैत्रिण हिने काही दिवसापुर्वी आत्महत्या केली होती. तेव्हापासुन नैराश्यग्रस्त होती. त्याच नैराश्यातुन घराचे छताचे सिलींग फॅनला साडीने गळफास घेवून आत्महत्या केली आहे. वगैरे **खबर निखिल अर्जुन मापारे, वय 38 वर्षे, व्यवसाय औषध विक्रेता रा. डॉक्टर लेन,नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे शिवाजीनगर** आ. मृ. **04**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री गायकवाड, मो.नं. 9370933727** हे करीत आहेत.

## 8)पाण्यात बडुन मृत्यु :—

**कंधार :—**दिनांक 03.02.2022 रोजी चे सायंकाळी 05.00 वा. ते दिनांक 05.02.2022 रोजी सकाळी 08.30 वा. चे दरम्यान, **मौजे जंगमवाडी शिवार नदीच्या कडेला ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे काशिनाथ रामराव बोधगिरे, वय 30** वर्षे, **रा. जंगमवाडी ता. कंधार जि. नांदेड**, हा शेतातील उसाला पाणी देण्याकरीता गेला होता. स्वतःचे शेता लगत असलेल्या नदीच्या कडेला पाण्यावर तरंगत असलेला मिळुन आला. वगैरे **खबर देणार देवानंद केरबा बोधगिरे, वय 41** वर्षे, **व्यवसाय शेती रा. जंगमवाडी ता. कंधार जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. **05**/2022 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोह/2059 सानप, मो.नं. 9420841070** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :—

**तामसा :—** दिनांक 05.02.2022 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, **खंडोबा मंदीराजवळ आष्टी ता. हदगाव जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारु किंमती 1960/—रुपयाचा माल चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी सपोउपनि/दिगांबर किशनराव डुडूळे, ने. पोस्टे तामसा** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे तामसा** गुरनं 13/2022 कलम 65(ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/83 राठोड**, **मो.क्र. 9960425932** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**

पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड